 रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मे ५, २००७/वैशाख १५, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . . . . २०६-२०७

दिनांक ५ मे २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ५ मे २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९५६ चा मुंबई ४९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[**किंमत** : रुपये ९.००]

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम ५ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— १९५६ चा मुंबई ४९.

(क) खंड (एक) मध्ये, " पहिल्या वर्गाचे " या मजकुराऐवजी " वातानुकूलित टू-टियर चे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये, " पाच रुपये प्रति किलोमीटर " या मजकुराऐवजी " सहा रुपये प्रति किलोमीटर " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई